प्रेस नोट दि. ०८/०८/१७

## ''तडीपार गुन्हेगारांस अटक''

पुणे शहरातील दक्षिण प्रादेशिक विभाग दरोडा प्रतिबंधक पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना मा.रविंद्र सेनगांवकर अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे यांनी आगामी दहिहंडी व गणेशोत्सव सण सुरळीत पार पाडणेसाठी पुणे शहरातील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना चेक करून त्यांचेवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने दक्षिण प्रादेशिक विभागातील अधिकारी व कर्मचारी हे पेट्रोलिंग करीत असताना पथकातील पोना दड्डीकर व पोशि कांबळे, यांना मिळालेल्या बातमीवरून इसम नामे १) परशुराम जयराम शिंदे, रा. १३, ताडीवाला रोड. पुणे २) फिरोज हुसेन शेख, रा. १३, ताडीवाला रोड. पानमळा, पुणे या सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले. सदर गुन्हेगारांवर जबरी चोरी, मारामारी, मालमत्ता व शरीराविरूधचे ११ गुन्हे दाखल असुन सदर गुन्हेगारांची ताडीवाला रोड,पानमळा बंडगार्डन या भागात दहशत आहे. नमुद गुन्हेगारांना मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ यांनी पुणे शहर व पुणे जिल्हयातुन दोन वर्षाकरीता तडीपार केलेले आहे. सदर गुन्हेगारांनी तडीपार आदेशाचा भंग केला म्हणुन त्यांचेवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील कारवाई ही मा.श्री.रविंद्र सेनगावकर, अपोआ दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, यांचे आदेशाने श्री.प्रविण मुंढे, पोउआ परीमंडळ २ पुणे, श्री.शिवाजी पवार, सपोआ स्वारगेट विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरीक्षक प्रकाश मोरे पो.हवा.दिनेश शिंदे,रविंद्र फुलपगारे पो.ना.अय्याज दड्डिकर पो.शि. नितीन जगदाळे, नितीन जाधव, वैभव शितकल,युवराज कांबळे,प्रमोद मोहिते,मयुर शिंदे व स्टाफने पार पाडली आहे.